# उपवनसंरक्षक,
# वर्धा वनविभाग, वर्धा यांचे कार्यालय

पत्ता :- डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याच्या पाटीमागे सिव्हील लाईन वर्धा
दुरध्वनी क्रं 07152 - 240170
Email-Id dycfwardha@gmail.com, dycfwardha@mahaforest.gov.in


जा.क्र.कक्ष-12/शिली-1/304/2025-26 वर्धा दिनांक 13/06/2025

**विषय** :- मानद वन्यजिव रक्षक म्हणुन महिलांची नियुक्ती करणेबाबत.

**प्रति,**
**वनसंरक्षक (प्रादेशिक),**
**नागपूर.**

**संदर्भ** :- 1) आपले कार्यालयीन पत्र क्र.कक्ष-5/दक्षता/मानद वन्य.नियु./प्र.क्र.170/2024-25/903/ नागपूर दिनांक 13/06/2025.

संदर्भिय विषयाकिंत प्रकरणी कळविण्यात येते की, मानद वन्यजिव रक्षक म्हणुन महिलांची नियुक्ती करणेबाबत आपलेकडील उक्त संदर्भान्वये निर्देश प्राप्त झाले आहे. त्याअनुषंगाने वर्धा जिल्हाकरीता वन्यजिव रक्षक पदी काम करण्याची संधी मिळण्याकरीता उमेदवाराकडून अर्ज मागविण्याकरीता http//mahaforest.gov.in या संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द करण्यात यावी हि विनंती.

**(हरवीर सिंह)**
**उपवनसंरक्षक,**
**वर्धा वनविभाग वर्धा**

**प्रतिलिपी** :- श्री.योगेश काळे, NIC Programmer यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीस अग्रेषित. त्यांनी सदर जाहिरात http//mahaforest.gov.in या संकेतस्थळावर प्रकाशित करण्यात यावी.

Scanned with OKEN Scanner

उपवनसंरक्षक,
वर्धा वनविभाग, वर्धा यांचे कार्यालय
पत्ता :- डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याच्या पाटीमागे सिव्हील लाईन वर्धा
दुरध्वनी क्र 07152 - 240170
Email-Id dycfwardha@gmail.com, dycfwardha@mahaforest.gov.in

महाराष्ट्र वन विभाग

## महिला मानद वन्यजिव रक्षकांची नियुक्ती करणेबाबत
## जाहिरात

मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), नागपूर वनवृत्त, नागपूर यांचे अधिनिस्त क्षेत्र तथा वर्धा जिल्हाकरीता वनसंरक्षण व वनसंवर्धनाचे काम करण्या-या महिलांची वाढती संख्या विचारात घेऊन प्रत्येक जिल्ह्यात कमीत कमी दोन योग्य महिलांना मानद वन्यजिव रक्षक म्हणून काम करण्याची संधी देणे आवश्यक असल्याचे मा.मंत्री (वने) यांनी सुचना दिलेल्या आहेत.सदर बाबतीत पुरेसा प्रतिसाद प्राप्त करुन घेणेकरीता संबंधित वृत्तस्तरावरुन जाहिरात प्रकाशित करुन महिला उमेदवाराकडून मानद वन्यजिव रक्षकांची नियुक्ती करावयाची आहे.नियुक्तीसाठी पात्र महिला उमेदवाराकडून केवळ वर्धा वनविभागाचे ई-मेल dycfwardha@gmail.com, dycfwardha@mahaforest.gov.in या वर अर्ज मागविण्यात येत आहे.

**अर्जासह खालीलप्रमाणे कागदपत्रे जोडावी :**

1. **ओळखपत्र**
2. **कायमचा पत्ता याबाबतचा पुरावा.**
3. **फोटो**
4. **वन्यजिव संरक्षण, संवर्धन, मानद-वन्यजिव संघर्ष तसेच निसर्गात संकटग्रस्त, नामशेष होत चाललेल्या प्रजातीचे संवर्धन, संरक्षण इ.बाबत केलेल्या कामाचा तपशिल.**

वरील जाहिरातीचे अनुषंगाने याव्दारा सुचित करण्यांत येते की, वनसंरक्षण व वनसंवर्धनाचे काम करणाऱ्या तसेच मानद-वन्यजिव संघर्ष कमी करण्याचे काम करणाऱ्या उमेदवारांची / सेवाभावी संस्थांची वाढती संख्या विचारात घेऊन वन्यजिव संरक्षणार्थ महिला मानद वन्यजिव रक्षक म्हणून काम करण्याची संधी उपलब्ध व्हावी यासाठी मानद वन्यजिव रक्षक या पदाकरीता वन्यजिव संरक्षणार्थ केलेल्या कामासंबधात स्वतंत्र प्रस्तावासह अर्ज मागविण्यात येत आहे.

| अ.क्र | कार्यवाहीचा टप्पा | दिनांक व कालावधी |
|---|---|---|
| 1 | उपवनसंरक्षक वर्धा वनविभाग, वर्धा या कार्यालयाचे ई-मेल dycfwardha@gmail.com , dycfwardhamahaforest.gov.in या आयडीवर अर्ज स्विकारणे कालावधी | दिनांक 16 जुन 2025, पासुन ते 23 जुन 2025 रोजी सायंकाळी 5.00 वा.पर्यंत |
| 2 | उपवनसंरक्षक, वर्धा यांचेमार्फत प्राप्त अर्जाची छानणी करणे. | दिनांक 23 जुन 2025, ते 27 जुन 2025 |

(हरवीर सिंह)
उपवनसंरक्षक,
वर्धा वनविभाग वर्धा

Scanned with OKEN Scanner